सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
१७ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.

क्र:प्रविस्था-१२(२०२४)/७ वा वेतन अयोग/वेतन त्रुटी निवारण समिती/का-१/ ८०८ दिनांक : 2 8 MAR 2024

विषय : सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी मधील त्रुटींचे निवारण करण्याकरिता वेतन त्रुटी समिती २०२४ ची स्थापना.

संदर्भ : शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.वेपुर-११२३/प्र.क्र.१७/सेवा-९, दि.१६.०३.२०२३

परिपत्रक

उपरोक्त नमूद शासन निर्णयाचे कृपया अवलोकन व्हावे. सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतन सुधारणेच्या अनुषंगाने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दि.३०.०१.२०१९ च्या शासन अधिसूचनेन्वये दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतनश्रेणी विहित करण्यात आली आहे. मा.न्यायालयाच्या आदेशानुसार, सातव्या वेतन आयोगातील वेतन त्रुटींबाबत विविध न्यायालयातील दाखल रिट याचिकांच्या अनुषंगाने तपासणी करून शिफारशी करण्याकरीता वेतनत्रुटी निवारण समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर समितीने प्रशासकीय विभागांकडून एखाद्या विशिष्ट संवर्गाच्या सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी मधील त्रुटी संबंधित सादर होणाऱ्या प्रकरणांची तपासणी करून समितीने नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपला अहवाल शासनस सादर करावा असे उक्त शासन निर्णयामध्ये नमूद केले आहे.

एकखाद्या विशिष्ट संवर्गांच्या सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीमध्ये त्रुटी आहेत, असे प्रशासकीय विभागाच्या सचिवांना/विभागप्रमुखांना ज्या प्रकरणी वाटेल ती प्रकरणे त्यांनी केंद्र शासनाकडील समतुल्य पद त्यांची सुधारणापूर्व वेतनश्रेणी आणि सुधारीत वेतनश्रेणी सेवाप्रवेश नियम, कर्तव्ये व जबाबदाऱ्या इत्यादी बाबी विचारत घेऊन तपासाव्यात व तपासणीअंती अशा प्रकरणामध्ये त्रुटी आहे अशी त्यांची खातरजमा झाल्यास, त्यासबंधीचे प्रस्ताव (४ प्रतीत) योग्य त्या समर्थनासह शासन आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून २ महिन्यांच्या आत समितीकडे पाठवावे.

तसेच शासकीय कर्मचाऱ्यांच्या मान्यता प्राप्त संघटनेस/महासंघास काही संवर्गाच्या सातव्या वेतन आयोगातील त्रुटी बाबत निवेदने सारर करावयाची झाल्यास ती संबंधित प्रशासकीय विभागमार्फत सादर करावीत व प्रशासकीय विभागाने या निवदानांची करून वरील परिच्छेद मध्ये नमूद केल्यानुसार आपल्या शिफारशीसह प्रस्ताव समितीच्या विचारार्थ सादर करावेत असे ही उक्त शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

उपरेक्त बाब याद्वारे सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. सदर परिपत्रक महासंचालनालयाच्या www.dgipr.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर देखील उपलब्ध करून देण्यात येत आहे.

(हेमराज बागूल)
संचालक (माहिती)(प्रशासन)

प्रति,

सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी, तसेच अधिनस्त कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी संघटना, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय.

प्रत :- कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मावज-२, मंत्रालय, मुंबई -३२.

प्रत सादर अग्रेषित :- मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई